कापुरबावडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २६ /२०२६ दि. २४/०१/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, कापूरबावडी वाहतूक उप विभागाचे हद्दीमध्ये साकेत बाळकुम रोडवर ग्लोबल हॉस्पीटल या ठिकाणी दादा भगवान परिवार, महावीर जैन ट्रस्ट व ठाणे महानगरपालिका ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात आलेल्या त्रि–मंदिर चा प्राण प्रतिष्ठा सोहळा दिनांक ३०/०१/२०२६ रोजी पासुन ते दिनांक ०१/०२/२०२६ रोजी पावेतो पार पडणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१)(अ)(ब)अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

प्रवेश बंद – १) कळवा क्रिक नाक्याकडून साकेत मार्गे बाळकुमकडे जाणारे मालवाहू (टेम्पो, ट्रक व जड अवजड अशा) वाहनांना **साकेत कॉम्पलेक्स जवळील महालक्ष्मी मंदिर** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरचे मार्गावरून जाणारी मालवाहू (टेम्पो, ट्रक व जड अवजड) वाहने ही साकेत कॉम्प्लेक्स येथील महालक्ष्मी मंदिर येथुन डावीकडे वळण घेवून पुढे रूस्तमजी कट मधुन बाहेर पडून नाशिक – मुंबई महामार्गावरून इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) कशेळी कडून बाळकुम मार्गे – साकेत कडे जाणारे मालवाहू (टेम्पो, ट्रक व जड अवजड अशा) वाहनांना **बाळकुम नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरचे मार्गावरून जाणारी मालवाहू (टेम्पो, ट्रक व जड अवजड) वाहने ही पुढे सरळ जावून माजिवडा प्रभाग समिती चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – ३) माजीवडा गावातून लोढा संकूलातून बाहेर पडून साकेतकडे जाणारे मालवाहू (टेम्पो, ट्रक व जड अवजड अशा) वाहनांना **लोढा संकूलातुन बाहेर पडण्याचे ठिकाणी 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – अ) सदरचे मार्गावरून जाणारी मालवाहू (टेम्पो, ट्रक व जड अवजड) वाहने ही लोढा संकुलातून बाहेर पडण्याचे ठिकाणी डावे बाजूस वळण घेवुन बाळकुम नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

ब) सदरचे मार्गावरून जाणारी मालवाहू (टेम्पो, ट्रक व जड अवजड) वाहनांना लोढा संकुलातून बाहेर पडण्याचे ठिकाणी यु टर्न घेवुन लोढा संकुलातून बाहेर पडून माजिवडा गोल्डन नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसूचना दिनांक ३०/०१/२०२६ रोजी सकाळी ०७:०० वा. ते दिनांक ०१/०२/२०२६ रोजी रात्री २०.०० वाजेपर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

प्रत कार्यवाहीकरीता :—

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :— सपोआ वाहतूक विभाग, वागळे व पो.निरी. कापुरबावडी वाहतूक उप विभाग.

२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावी.